# पुणे विद्यापीठ
# महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
# संशोधन प्रकल्प योजना – नविन नियम २०११.

१. संशोधन प्रकल्पाचे हिशेब सादर करतांना प्रत्येक देयकावर महाविद्यालयाचे प्राचार्य व शैक्षणिक समन्वयक यांची स्वाक्षरी असणे गरजेचे आहे.

२. महाविद्यालयांनी आवर्ती / अनावर्तीत खर्च केलेल्या देयकावर Dead Stock Entry आवश्यक आहे तसेच रूपये २०,०००/– च्या वरील खरेदीस दरपत्रके मागवून व त्याचा तैलनिक तक्ता करून कमी दर असलेल्या पुरवठाधारकांस खरेदीचे आदेश देण्यात यावे.

३. संशोधन प्रकल्प योजने अंतर्गत पुस्तक खरेदी केली असल्यास ग्रंथालयाकडून Accession No. टाकणे आवश्यक आहे. व वस्तुंची Stock Entry असणे आवश्यक आहे.

४. संशोधन प्रकल्प योजने अंतर्गत उपकरणे खरेदी करिता प्राप्त अनुदानाच्या २५% रक्कम मान्य केली जाईल प्रोजेक्ट च्या आवश्यकते नुसार मा. संचालक यांच्या पुर्व परवानगीने Laptop घेण्यास मान्यता देण्यात येईल, २५% च्या वर रक्कमेस मुल्यमापन समिती अथवा मा. संचालक यांची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहिल. मदर बोर्ड, डीव्हीडी रायटर, हार्ड डिस्क, रॅम, अॅन्टीव्हायरस, पेनड्राईव्ह, कम्प्युटर, मोबाईल, डिव्हीडी, स्टीम ओव्हन, होम थिएटर, मिक्सर, हॅडीकॅमेरा, प्रिंटर, स्कॅनर, फ्रिज, कपाट, पुस्तके रॅक, फर्निचर इत्यादी खरेदीची बीले मान्य करण्यात येणार नाहीत.

५. संशोधन प्रकल्पा अंतर्गत राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय चर्चा सत्राला हजर राहण्यासाठी विमान प्रवास किंवा इतर खर्च अमान्य करण्यात येईल. फक्त Innovation चा खर्च मान्य करण्यात येईल.

६. संशोधन प्रकल्प योजने अंतर्गत अनुदान प्राप्त रक्कमेच्या १०% रक्कम फक्त प्रवासा करिता वापरण्यास मंजूरी देण्यात येईल. या पुढील रक्कमेचा प्रस्ताव मान्य करण्याचे अधिकार मुल्यमापन समिती अथवा मा. संचालक यांना राहतील.

७. इंटरनेट वापरल्यास कंपनीचे बील आवश्यक राहिल. (संशोधन प्रकल्प कालावधी जास्तीत जास्त १५००/–रूपये मान्न)

८. पुणे विद्यापीठ नियमा प्रमाणे प्रवासाचे भाडे तसेच विद्यार्थ्यांचे मानधन मान्य करण्यात येईल.

९. प्रोजेक्टच्या आवश्यकतेनुसार मा. संचालक यांच्या पूर्व परवानगीने Life Science, Geology, Geography इत्यादी विषयांना फक्त कॅमेरा घेण्यास मंजूरी देण्यात येईल.

१०.संशोधक प्राध्यापकांनी सहामाही अहवाल व वार्षिक अहवाल ( एक प्रत) आपआपल्या महाविद्यालयातील अे.आर.सी.च्या मार्फत ओ.एस.डी./बी.सी.यु.डी. ऑफिसमध्ये जमा करणे आवश्यक राहिल.

११. संशोधक प्राध्यपकांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील जर्नलमध्ये शोधनिबंध प्रसिध्द केल्यास किंवा पेटंट दाखल केल्यास त्यांची प्रत विशेष कार्यकारी बी.सी.यु.डी. ऑफीस मध्ये पाठविण्यात यावी . तसेच शोधनिबंधामध्ये पुणे विद्यापीठास Acknowledge करणे आवश्यक आहे.

१२. संशोधन प्रकल्प सन २०११–२०१२ मधील पहिल्या हप्त्याचे अनुदान एप्रिल २०११ ते मार्च २०१२ याचं कालावधीत खर्च करणे बंधनकारक राहिल.

१३. संशोधन प्रकल्प सन २०११–२०१२ करिता Schedule :–

१. अनुदानाचा पहिला हप्ता :– मार्च २०११.
२. पुणे विद्यापीठ Central Audit :– मार्च २०१२.
३. अनुदानाचा दुसरा हप्ता :– एप्रिल २०१२.
४. पुणे विद्यापीठ Central Audit :– मार्च २०१३.
५. प्रोजेक्ट फायनल रिपोर्ट सबमिशन एक कॉपी ओ.एस.डी ऑफिस :– मार्च २०१३.
६. अनुदानाचा तीसरा हप्ता :– एप्रिल २०१३.

डॉ. मोहन वामन
बी.सी.यु.डी./ओ.एस.डी.

डॉ. वासुदेव गाडे
संचालक, बी.सी.यु.डी.